# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षणमंडळ,
## नागपूर विभागीय मंडळ, नागपूर,सिव्हीललाईन्स, नागपूर-440 001

Email: Nagpur@msbshse.ac.in / Fax. No. 0712-2561775

Tel. Divisional Chairman/Divisional Secretary 0712-2560319 PBX-0712-2560209/2565403/2553401/2553360


तातडीचे / कालमर्यादित

पत्र कमांक / नाविमं / उमागो / 921

नागपूर,दिनांक :–12/03/2018

प्रति,

प्राचार्य,

सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,

नागपूर विभाग नागपूर

**विषय:**– उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१२ वी)फेब्रुवारी/मार्च २०१८ परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासणीवरील बहीष्कार बाबत...

**संदर्भ :**–आपणाकडून प्राप्त पत्रे तसेच दुरध्वनी संदेश...

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की,इ.12 वी परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासणीवर बहीष्कारासंबंधी पत्रे या कार्यालयास प्राप्त होत आहेत. तथापि आपल्या मागण्या या शासनाशी संबंधित असल्याने आपण आपल्या मागण्याबाबत शासन दरबारी पाठपूरावा करावा.

विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांच्या मुल्यांकनावर बहिष्कार टाकणे तसेच मंडळास वेठीस धरणे उचित नसून इ.12 वीला प्रविष्ठ होणारे विद्यार्थी हे आपलेच असून सर्व अनुदानित विनाअनुदानित शाळातील/ कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकास लिखित उत्तरत्रिकांच्या परीक्षण/समिक्षणाचे कार्य करणे अनिवार्य आहे. महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती)नियमावली नियम १९८१ मधील तरतूदीनुसार मंडळाची परीक्षा विषयक गोपनिय काम करणे शिक्षकांवर बंधनकारक आहे. तसेच अध्यापन मुल्यांकन हा शिक्षकांच्या कर्तव्याचाच भाग आहे,याची जाणीव सर्व संबंधित कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना आपल्या स्तरावरुन करुन द्यावी,व उत्तरपत्रिका तपासण्यावर बहीष्कार न टाकता त्यांची तपासणी करुन मुल्यांकनाचे कालमर्यादीत काम पार पाडावे व मंडळास सहकार्य करावे. जेणेकरुन विद्यार्थ्यांचे निकाल वेळेवर लावणे सोईचे होईल व विद्यार्थी पालक यांची पुढील शिक्षणाकरीता गैरसोय होणार नाही.

रविकांत देशपांडे

विभागीय सचिव,

नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रत माहिती तथा पुढील कार्यवाहीस्तव –

1.मा.सचिव,महाराष्ट्र राज्य माध्य.व उच्च माध्य.शिक्षण मंडळ,भांबुर्डा,शिवाजीनगर,पुणे–04

2. मा.शिक्षण उपसंचालक,नागपूर विभाग नागपूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीकरिता.

3. संस्था सचिव/अध्यक्ष यांना माहितीस्तव योग्य त्या कार्यवाहीस्तव.